# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मुंबई शहरात प्रवेश करणाऱ्या अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवण्याकरीता कार्यवाही करण्याबाबत

**(१) १०३९५ (१७-११-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सकाळी ७ ते ११ आणि संध्याकाळी ५ ते ९ या कालावधीत अवजड वाहनांना प्रवेशबंदी असतानाही अवजड वाहने मुंबईत प्रवेश करित असल्याने मुंबईकरांना वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईत सकाळी आणि संध्याकाळी प्रवेश करण्यास बंदी असतानासुध्दा प्रवेश बंदीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाई करुन अवजड वाहनांच्या प्रवेशावर नियंत्रण ठेवण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) अपर पोलीस आयुक्त (वाहतूक) यांच्या दिनांक २३/०१/२०१८ रोजीच्या अधिसूचने अन्वये मुंबई उपनगरात सकाळी ८ ते ११ आणि संध्याकाळी १७ ते २१ या कालावधीत तसेच दक्षिण मुंबईत सकाळी ८ ते रात्रौ २४ वाजेपर्यंत अवजड वाहनांना कायमस्वरुपी प्रवेशबंदी करण्यात आलेली आहे.

नमूद वेळेत अवजड वाहने धावताना आढळून आल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाते.

(२) दिनांक ०१/०१/२०२१ ते दिनांक ३१/१०/२०२१ या कालावधीत उपरोक्त प्रवेशबंदी असलेल्या वेळेत प्रवेश करणाऱ्या १,७९,३६८ अवजड वाहनांवर ई-चलन कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोराई (मुंबई) येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या जागेवर अनधिकृतपणे घरे बांधून विक्री केल्याबाबत

**(२) १०४०४ (२३-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोराई (मुंबई) येथील सर्व्हे क्रमांक ५३ येथे समुद्रकिनाऱ्यापासून काही मिनिटांच्या अंतरावर असलेल्या महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) च्या मालकीच्या जागेवर अनधिकृतपणे घरे बांधून विक्री करण्यात आल्याप्रकरणी गोराई पोलीस ठाण्यात दिनांक १९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) व (२) होय, गोराई (मुंबई) येथील सर्व्हे क्रमांक ५३ येथे समुद्रकिनाऱ्याजवळ असलेल्या महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) च्या मालकीच्या जागेवर अनधिकृतपणे घरे बांधून विक्री करण्यात आल्याप्रकरणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे

व्यवस्थापक यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गोराई पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.४७/२०२१ कलम ४०६, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४४७, ४७१, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी संबंधित आरोपींनी मा.न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता त्यानुषंगाने न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू असून आरोपी विरुध्द सबळ पुरावे प्राप्त करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेच्या सहायक आयुक्तांवर प्राणघातक हल्ला झाल्याबाबत

**(३) १०४०८ (२३-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासारवडवली (जि.ठाणे) येथे ठाणे महानगरपालिकेच्या सहायक आयुक्तांवर फेरिवाल्याने दिनांक ६ सप्टेंबर,२०२१ रोजी चाकूने हल्ला करुन त्यामध्ये सहायक आयुक्तांच्या हाताची दोन बोटे व त्यांच्या अंगररक्षकाचे एक बोट तुटले आहे, सदर फेरीवाल्यांच्या हल्ल्याप्रकरणी मुंबई-ठाणे महानगरपालिका व नगरपालिकेतील अधिकारी-कर्मचारी यांनी एक दिवसाचे काम बंद आंदोलन केल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेनंतर डोंबिवलीमध्ये दोन भाजी विक्रेत्यांमध्ये हाणामारी झाल्याची घटना माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान घडली असून सदर घटनेबाबत रामनगर पोलीस ठाणे, डोंबिवली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने फेरीवाल्यांना शिस्त लागावी म्हणून फेरीवाला धोरण राबविण्याचा निर्णय १० वर्षांपूर्वी घेतला असूनही या धोरणांची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, फेरीवाला धोरणांच्या फेरीवाला समितीत लोकप्रतिनिधींच्या समावेशाबाबत शासनाकडून उत्तर येत नसल्याने संपूर्ण धोरण रखडले आहे, सन २०१८ मध्ये महापालिकेने याबाबत शासनाच्या नगरविकास विभागाला पत्र पाठवूनही याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हल्लेखोर फेरीवाल्यांविरुध्द कारवाई करुन भविष्यात अशा घटना घडू नयेत याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे. उक्त घटनेबाबत कासारवडवली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२९५/२०२१, भादंवि कलम ३०७, ३५३, ३३२, ३३३ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधि.१९५१ चे कलम ३७(१) १३५ प्रमाणे दिनांक ३०/०८/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे. उक्त घटनेनंतर डोंबिवली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२२९/२०२१ भा.दं.वि. कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे दिनांक ०२/०९/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यामध्ये ४ आरोपितांना अटक करण्यात आली असून त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) व (४) मुंबई महानगरपालिकेने फेरीवाल्यांना शिस्त लागावी म्हणून फेरीवाला धोरण राबविण्याचा निर्णय १० वर्षांपूर्वी घेतला असून मात्र अद्याप या धोरणांची अंमलबजावणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे. तथापि, केंद्र शासनाने पदपथ विक्रेते (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम,२०१४ लागू केलेला असून राज्य शासनाने महाराष्ट्र पदपथ विक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील

विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ हे दिनांक ०३/०८/२०१६ रोजी प्रसिध्द केलेले आहेत. तद्नंतर सदर अधिनियमातील कलम ३८(१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०१७ दिनांक ०९/०१/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे.

पथविक्रेता अधिनियम-२०१४, नियम व योजना यामधील तरतूदीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे. पदपथ विक्रीचे (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ (भारत सरकार) मध्ये नगर सेवकांचा पथविक्री समितीमध्ये समावेश करण्याबाबत तरतूद नाही. या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) सदर दोन्ही प्रकरणात गुन्हा दाखल असून आरोपींना अटक करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात येत आहे.

---

## राज्यात दहशतवादविरोधी पथक (ए.टी.एस.) मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) १०४१२ (२३-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दहशतवादविरोधी पथक (ए.टी.एस.) मधील अधिकारी व कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दहशतवादविरोधी पथक (ए.टी.एस.) मधील अधिकारी व कर्मचारी यांच्या रिक्त असलेल्या पदांमुळे ए.टी.एस. अंतर्गत गुन्ह्याची उकल करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दहशतवादविरोधी पथक (ए.टी.एस.) मधील अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) व (२) राज्यातील दहशतवादविरोधी पथकासाठी एकूण ७१३ मंजूर पदे असून, त्यापैकी ५४१ पदे कार्यरत असून १७२ पदे रिक्त आहेत.

उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करुन दहशतवाद विरोधी पथकातंर्गत गुन्ह्यांचा तपास करण्यात येत आहे.

(३) दहशतवाद विरोधी पथकातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे पदोन्नती/बदलीने भरण्याबाबतची कार्यवाही पोलीस महासंचालक यांचे कार्यालयाकडून सुरु आहे. तसेच पोलीस अंमलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित पोलीस आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिल्याबाबत

**(५) १०४४१ (२३-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विनायकराव मेटे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत चार वर्षात खाजगी विमा कंपन्यांनी रुपये २३ हजार १८० कोटी गोळा करुन त्यातून केवळ रुपये १५ हजार ६२२ कोटी वाटप केले असून रब्बी हंगाम सन २०१९ मध्ये १.६७% रक्कम, खरीप हंगाम सन २०२० मध्ये १५.७९% रक्कम वाटप केली तर रब्बी हंगाम २०२० मध्ये काहीही वाटप केले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भासह राज्यातील पीक विमा भरलेले अनेक पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ न मिळाल्याने शेतकरी खरीप हंगाम सन २०२० च्या पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिले असून शेतकऱ्यांना खत, बियाणे व मशागत करण्यासाठी आर्थिक भार सोसावा लागत असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खरीप सन २०२१ च्या हंगामात राज्यातील जालना, परभणी, नांदेड, बीड, अकोला, उस्मानाबाद व नाशिक या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पीक विम्याबाबत काढलेल्या अधिसूचनेवर संबंधित विमा कंपन्यांनी घेतलेल्या हरकतींवर कार्यवाही करुन विहित मुदतीत निकाली न काढल्यामुळे हजारो शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमा कंपन्यांची जाचक अटी सुधारुन अटीमध्ये शिथिलता आूणन राज्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात खरीप सन २०१७ ते रब्बी सन २०२०-२१ मध्ये (गत ४ वर्षात) विमा कंपन्यांना एकूण विमा हप्त्यापोटी रक्कम रुपये १९१९४.०७ कोटी मिळाला असून एकूण रक्कम रुपये १४०२९.४५ कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे.

हंगामनिहाय निश्चित नुकसान भरपाई व वाटपाचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | हंगाम | निश्चित नुकसान भरपाई (रुपये कोटी) | वाटप नुकसान भरपाई (रुपये कोटी) |
|---|---|---|---|
| १ | रब्बी २०१९-२० | ७.१७ | ६.९७ |
| २ | खरीप २०२० | १०६७.९९ | ८४४.६४ |
| ३ | रब्बी २०२०-२१ | ४८.३६ | ०० |

(२) अंशत: खरे आहे.

खरीप हंगाम २०२० मध्ये दिनांक २२/११/२०२१ पर्यंत १६.०२ लाख शेतकऱ्यांना रुपये १०६७.९९ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून १२.३६ लाख शेतकऱ्यांना रुपये ८४४.६४ कोटी नुकसान भरपाई विमा कंपन्यांनी अदा केली आहे. तथापि, योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान भरपाई याबाबी अंतर्गत नुकसान

भरपाई झाल्यास याबाबतची पुर्व सूचना विमा कंपनीस देणे आवश्यक असून राज्यातील काही शेतकऱ्यांनी पुर्वसूचना न दिल्यामुळे विमा कंपन्यांना शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा केली नसल्याचे निदर्शनास आल्याने NDRF च्या धर्तीवर उर्वरित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत विमा कंपन्यांना कळविण्यात आले आहे. सदर योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येत असून याअनुषंगाने विमा कंपन्यांना निर्देश देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार हंगामातील प्रतिकुल परिस्थिती या बाबी अंतर्गत राज्यात खरीप २०२१ मध्ये २३ जिल्हयांमार्फत अधिसूचना निर्गमित करण्यात आली होती.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार हंगामातील प्रतिकुल परिस्थिती या बाबी अंतर्गत राज्यात खरीप २०२१ मध्ये एकूण ११.३६ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रुपये ४२५.३३ कोटी निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ९.६९ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ३९२.५८ कोटी वाटप करण्यात आले आहेत. उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

सोलापूर, नाशिक व परभणी जिल्हयामार्फत काढण्यात आलेल्या अधिसूचनेवर संबंधित विमा कंपनीने राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे अपिल केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य मानवी हक्क आयोगावरील अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्या करण्याबाबत

**(६) १०४४२ (२४-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळण्यासाठी राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आला असून मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास अगदी साधेपत्र पाठवून लोकसेवाच्या विरोधात आयोगाकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मानवी हक्क आयोगावरील नियुक्त्या प्रलंबित राहिल्यामुळे ४५ हजार प्रकरणे प्रलंबित राहिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मानवी हक्क आयोगावर अध्यक्ष व २७ सदस्यांची पदे रिक्त असल्यामुळे मानवी हक्क आयोगाचे कामकाज पूर्णपणे बंद झाले आहे, त्यामुळे राज्यातील सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम करणारा राज्य मानवी हक्क आयोगच न्यायाच्या प्रतिक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य मानवाधिकार आयोगावर अध्यक्ष, सदस्य आणि कर्मचारी वर्गाची नियुक्ती एका महिन्यात करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी शासनाला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अध्यक्ष व सदस्य पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांच्या नावांची शिफारस मुख्य न्यायमूर्तीकडून राज्य शासनाला करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य मानवी हक्क आयोगावरील अध्यक्ष तसेच २७ सदस्यांच्या नियुक्त्या करुन राज्य मानवी हक्क आयोगाकडील प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) होय.

(२) आयोगात माहे ऑक्टोबर, २०२१ पर्यंत २४१७० प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३) मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ मधील कलम २१ (२) येथील तरतुदीनुसार राज्य मानवी हक्क आयोगाची रचना १ अध्यक्ष व २ सदस्य अशी आहे.

(४) होय.

(५) अध्यक्ष व १ सदस्य (न्यायिक) या पदांसाठी उमेदवारांच्या नावांच्या शिफारशी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाकडून शासनास उमेदवारांच्या नावांच्या शिफारशी प्राप्त झाल्या.

(६) अध्यक्ष व २ सदस्य यांच्या नियुक्तीकरीता शिफारस करण्यासाठी उक्त अधिनियमातील कलम २२ (१) नुसार मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीची बैठक दिनांक २१/१०/२०२१ रोजी झाली.

सदर बैठकीमध्ये उमेदवारांच्या नावांच्या केलेल्या शिफारशीनुसार मा.राज्यपाल महोदयांनी अध्यक्ष व २ सदस्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

---

## फॉरेन्सिक सायन्स पदवीधारकाच्या समस्यांबाबत

**(७) १०४६० (२३-११-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ६४२२ ला दिनांक ९ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्थेतून सन २०११ पासून २००० विद्यार्थ्यांनी पदव्या घेतल्या असून उपरोक्त विद्यार्थ्यांना फॉरेन्सिक तज्ज्ञ म्हणून नोकरी मिळावी याकरीता १२ वर्षापासून प्रयत्न करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदवी घेतलेल्या पदवीधारकांच्या पदभरती संदर्भात दिनांक १४ जुलै, २०२१ रोजी मा.गृहमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेवून उपरोक्त विषयावर चर्चा केली असून फॉरेन्सिक तज्ज्ञांची पदभरती करण्यासाठी शासनाच्या संस्थेत शिकविलेला अभ्यासक्रम अयोग्य असल्याचे मत बैठकीत मांडले गेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फॉरेन्सिक सायन्स पदवीधर विद्यार्थ्यांवरील अन्याय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१४-१२-२०२१) :** (१) मुंबई,औरंगाबाद व नागपूर येथे स्थापन करण्यात आलेल्या शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्थांमधून आतापर्यंत पदवी (बी.एस्सी फॉरेन्सीक सायन्स) चे एकूण ११०२ आणि पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी फॉरेन्सिक सायन्स) चे एकूण ४०६ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

(२) व (३) फॉरेन्सिक सायन्स विद्यार्थांच्या अभ्यासक्रमात बदल करण्याबाबत मा.मंत्री गृह यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०७/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०१/१२/२०२१ च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे.

तसेच शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्थांमधून पदवी (बी.एस्सी फॉरेन्सिक सायन्स) आणि पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी फॉरेन्सिक सायन्स) घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी विद्यावेतन देऊन १ वर्षाकरीता न्यायसहायक प्रयोगशाळा संचालनालयामध्ये इंटर्नशिप देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्थेतून पदवी /पदव्युत्तर धारक विद्यार्थांना फॉरेन्सिक तज्ञ म्हणून नोकरी मिळावी याकरीता न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयातील गट- अ व गट-ब या संवर्गातील तांत्रिक पदाच्या सेवाप्रवेश नियमामधील शैक्षणिक अर्हतेमध्ये सुधारणा करण्याबाबत कार्यवाही विभागांतर्गत सुरु असून सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आडगांव (जि.नाशिक) डॉ.वसंतराव पवार मेडिकल कॉलेजमध्ये पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत

**(८) १०५०७ (२३-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगाव (जि.नाशिक) येथील डॉ.वसंतराव पवार मेडिकल कॉलेजमध्ये पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या डॉ.स्वप्निल शिंदे (२६) यांचा कॉलेजमध्ये संशयास्पद मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोन महिला डॉक्टरांविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज, आडगाव, नाशिक या हॉस्पिटलच्या ऑपरेशन थिएटरच्या बाजूला असलेल्या वॉशरुममध्ये दिनांक १७/०८/२०२१ रोजी डॉ. स्वप्निल शिंदे हे बेशुध्दावस्थेत आढळून आले. तदनंतर त्यांना आय.सी.यु. मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. तथापि, सदर दिवशीच त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

(२) याबाबत डॉ. ज्युही विजय केदारे व डॉ. सिध्दी सुधाकर फुके यांच्याविरुध्द श्री.महारुद्र शिंदे यांनी तक्रार दाखल केली आहे.

(३) सदर प्रकरणी आडगाव पोलीस ठाणे, आडगाव, नाशिक शहर येथे अ.मृ.र.नं. १००/ २०२१ सी.आर.पी.सी.१७४ प्रमाणे दिनांक १८/०८/२०२१ रोजी अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सदर प्रकरणाच्या चौकशीत अद्यापपर्यंत हॉस्पिटल प्रशासन व संबंधित दोन सिनियर डॉक्टर यांच्याविरुध्द काहीही ठोस पुरावा उपलब्ध झालेला नाही.

सदर प्रकरणी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली असून समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त असून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल.

(४) विलंब झालेला नाही.

---

## भुरकी (ता.वणी, जि.यवतमाळ) घाटावरुन अवैधरित्या वाळू उपसा सुरु असल्याबाबत

**(९) १०५०९ (२३-११-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुरकी (ता.वणी, जि.यवतमाळ) घाटावरुन अवैधरित्या उपसा केलेल्या वाळूचे खुल्या मैदानात साठे करण्यात आले असून सदरहू वाळू साठा तहसिलदार, वणी यांनी जप्तीत दाखविला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी भुरकी घाटावरुन अवैधरित्या वाळू उपसा करुन साठेबाजी करीत असल्याच्या तक्रारीवरुन संबंधित कंत्राटदाराविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करुन वाळू साठे जप्त करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, कारवाईचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१०-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पशुवैद्यकीय रुग्णालयाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) १०५१२ (२४-११-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील मारेगाव तालुक्यामधील पशुवैदयकीय रुग्णालय प्रशासनाच्या दिरंगाई, कर्मचाऱ्यांची कमतरता व जीर्ण झालेल्या इमारती यामुळे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मारेगाव तालुक्यात ३२ हजाराहून पशु संख्या असून पशुवैद्यकीय रुग्णालयाच्या दुरवस्थेमुळे पशुपालन करणाऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मारेगाव तालुक्यातील पशुवैद्यकीय रुग्णालयात अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करुन देणे, रुग्णालयाची देखभाल, दुरुस्ती करण्यासह अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१०-१२-२०२१) :** (१) व (२) मारेगाव तालुक्यांत श्रेणी-१ चे ३, श्रेणी-२ चे ४ तसेच फिरते पद १ अशा एकूण ८ पशुवैद्यकीय संस्था असून त्यापैकी फिरते पशुवैद्यकीय दवाखाना, मारेगांव ही संस्था पशु चिकित्सा श्रेणी-१ मारेगांवच्या इमारतीमध्येच कार्यरत आहे. उक्त दवाखाने स्वत:च्या इमारतीमध्ये असून, सदर इमारती मधूनच पशुवैद्यकीय सेवा पशुपालकांना पुरविल्या जातात.

मारेगांव तालुक्यामध्ये पशुधन विकास अधिकारी ५ पदे सहा.पशुधन विकास अधिकारी २ पदे व पशुधन पर्यवेक्षकांची ५ पदे अशी एकूण १२ पदे मंजूर असून पशुधन विकास अधिकारी यांची ५ पदे व पशुधन पर्यवेक्षकांची २ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील ४३२ उमेदवारांची शिफारस शासनास प्राप्त झालेली असून, सदर पदे भरण्याचे संकल्पित आहे.

उक्त पशुवैद्यकीय संस्थांमार्फत औषधोपचार, रोग प्रतिबंधक लसीकरण, खच्चीकरण, कृत्रिम रेतन इ.सर्व सेवा पशुपालकांना पुरविल्या जात आहेत. पशुवैद्यकीय सेवांसंदर्भात कोणत्याही पशुपालकांची तक्रार नाही.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील ४३२ उमेदवारांची शिफारस शासनास प्राप्त झालेली असून, सदर पदे भरण्याचे संकल्पित आहे.

मारेगाव तालुक्यातील पशुवैद्यकीय संस्थांच्या इमारती ह्या जिर्ण नसून आवश्यकते नुसार वेळोवेळी किरकोळ दुरुस्ती करवून घेतली जाते. सद्य:स्थितीत दवाखाना जिर्ण असल्याबाबत प्रस्ताव उपलब्ध नाही. पशुवैद्यकीय संस्थेस दैनंदिन वापराकरीता आवश्यक उपकरणे, साहित्य उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा परिषद बीड अंतर्गत पशुसंवर्धन विभागातील अनुसूचित जाती-जमातीच्या विशेष घटक योजनेमध्ये अनियमितता करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(११) १०५४८ (२४-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद बीड अंतर्गत सन २०१९-२० मध्ये पशुसंवर्धन विभागातील अनुसूचित जाती-जमातीच्या विशेष घटक योजनेमधील अनियमिततेबाबत आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांना चौकशी करण्याचे आदेश दिले असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांनी उपरोक्त बाबत चौकशी पूर्ण केली आहे काय, चौकशी अहवालामध्ये काय नमूद करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषद बीड अंतर्गत पशुसंवर्धन विभागातील अनुसूचित जाती-जमातीच्या विशेष घटक योजनेमध्ये अनियमितता करणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१०-१२-२०२१) :** (१) जिल्हा परिषद बीड अंतर्गत सन २०१९-२० मध्ये अनुसूचित जाती-जमातीच्या विशेष घटक योजनेमधील अनियमिततेबाबत आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद यांना सदर प्रकरणी चौकशी करण्यास निर्देशित केले होते.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी संबंधित तत्का. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, बीड आणि तत्का. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, बीड यांचेकडून खुलासा घेण्यात आला आहे. या अनुषंगाने प्राप्त खुलासा व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद यांच्या अहवालाच्या आधारे आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी संबंधितांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम १० नूसार विभागीय चौकशी सुरु केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना स्व.भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे थकीत अनुदान देण्याबाबत

**(१२) १०५८२ (२३-११-२०२१) श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरीता पात्र ठरु शकत नाहीत अशा शेतकऱ्यांसाठी शासनाने सन २०१८ पासून राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सन २०१८ मध्ये सदर योजनेंतर्गत फळबाग लागवड केलेली असताना या शेतकऱ्यांना देय असलेले रुपये ७५ लाख ६५ हजार इतके अनुदान शासनाकडून देण्यात आले नसल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१९-२०२० मध्ये १३४ हेक्टर व सन २०२१ मध्ये ४८ हेक्टर अशा एकूण १८२ हेक्टरवर नांदेड जिल्ह्यातील ३५७ शेतकऱ्यांनी फळबाग लागवड करुनही त्यांना अनुदान देण्यात आले नाही तसेच मागील दोन वर्षापासून सदर फळबाग योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लक्षांक देखील देण्यात आले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे थकीत अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना व राज्याची स्व.भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या दोन्ही योजनांचे मुख्य उद्दिष्ट हे फळबागांची लागवड करणे हे असल्याने कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाबाबत उपाययोजनेचा भाग म्हणून वित्त विभागाने दिनांक ०४/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेस अनुसरुन स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या राज्य योजनेंतर्गत नव्याने दायित्व निर्माण न करता केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

सन २०१८-१९ व सन २०१९-२० या आर्थिक वर्षात स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत फळबागांची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना अनुदानाचे प्रलंबित दायित्व अदा करण्यासाठी दिनांक ०६ डिसेंबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषी) यांना निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून क्षेत्रिय कार्यालयामार्फत लवकरच लाभधारक शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये प्रलंबित अनुदानाची रक्कम जमा करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सुक्ष्म सिंचन योजनेचे अनुदान वाटपाची कार्यवाही संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(१३) १०५८८ (२३-११-२०२१) श्री.अरुण लाड, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत "प्रति थेंब अधिक पीक" या अंतर्गत महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून यावर्षी राज्यात लॉटरी पध्दतीने २ लाख ४० हजार ३६६ शेतकऱ्यांची सुक्ष्म सिंचन योजनेसाठी निवड करण्यात आली असल्याचे दिनांक २८ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यासुमारास अनुदान वाटपाची लॉटरी काढण्यात येऊन अडीच लाख पात्र शेतकऱ्यांपैकी केवळ २५,८२९ शेतकऱ्यांनाच अनुदानाचे वाटप करण्यात आले असल्याचे माहे जुलै, २०२१ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ११ जून, २०२१ रोजी फलोत्पादन संचालक यांनी राज्यातील सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना पत्र पाठवून अनुदान वितरणातील संथ गतीबाबत त्याचे सदर पत्राद्वारे नाराजी व्यक्त करुन अनुदान वाटपाची कार्यवाही शीघ्रगतीने करण्याबाबत आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित २,३७,८३७ शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन योजनेच्या अनुदानाचे शीघ्रगतीने वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-१२-२०२१) :** (१) व (२) सन २०२०-२१ मध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन "प्रति थेंब अधिक पीक" योजनेंतर्गत पहिली संगणकीय सोडत माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये पार पडली व तद्नंतरही सोडत प्रक्रिया राबवून एकूण २,५१,४८१ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

त्यापैकी ९०,५६६ लाभार्थ्यांनी कागदपत्रे अपलोड केली असून ८९,९७८ लाभार्थ्यांना पूर्वसंमती देण्यात आली, पैकी ८७,१०५ लाभार्थ्यांनी संच बसवुन देयके सादर केली, त्यापैकी ८४,६६६ प्रकरणांची मोका तपासणी करुन ते अनुदान वितरणासाठी मंजूर केले आहेत. त्यापैकी ७२,१४१ लाभार्थ्यांना रुपये १३५.२७ कोटी निधी वितरीत केला आहे व उर्वरित लाभार्थ्यांना निधी वितरणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) संचालक (फलोत्पादन) यांनी योजनेच्या अंमलबजावणीची गती वाढविण्याच्यादृष्टीने सदर प्रशासकीय सूचना दिल्या असून या प्रकरणी चौकशीची आवश्यकता नाही.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार निधी वितरणाकरीता PFMS प्रणालीवर SNA Account ची कार्यवाही झाली असून उर्वरीत लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोयनानगर (ता.पाटण, जि.सातारा) येथे राज्य आपत्ती बचाव दल व पोलीस प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याबाबत

**(१४) १०५८९ (२३-११-२०२१) श्री.अरुण लाड** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयनानगर (ता.पाटण, जि.सातारा) येथे राज्य आपत्ती बचाव दल आणि पोलीस प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्यास शासनाने मान्यता दिली असल्याचे दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयनानगर येथील गट/सर्व्हे क्र.२५, २६ व २७ या क्षेत्रातील महसूल विभागाच्या अखत्यारीत असलेली जागा महसूल विभागाकडून गृह विभाग अथवा पोलीस महासंचालक कार्यालयाकडे हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महसूल विभागाकडे सादर करावा व त्यासंदर्भात पोलीस विभागाने पाठपुरावा करावा असे आदेश मा.गृहराज्यमंत्री (ग्रामीण) यांनी सातारा जिल्हा पोलीस प्रशासन व जिल्हाधिकारी, सातारा यांना त्याचवेळी दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जुलै, २०२१ मध्ये मा.गृहराज्यमंत्री (ग्रामीण) यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील संबंधित महसूल व पोलीस विभागाचे शासकीय अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत एका महिन्याच्या आत त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा असेही मा.गृहराज्यमंत्री (ग्रामीण) यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पूरपरिस्थिती लक्षात घेता महसूल विभागाकडून जागा हस्तांतरण व कोयनानगर (ता.पाटण, जि.सातारा) येथे राज्य आपत्ती बचाव दल व पोलीस प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) कोयनानगर (ता.पाटण, जि.सातारा) येथे राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दल व पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्यादृष्टीने महसूल विभागाचे नावे कोयनानगर, तालुका-पाटण, जिल्हा सातारा येथे असलेली गट क्र.२५, २६, २७, २९, ३१, ३२, ३३, ३४, ३५ मधील सुमारे ४१.७७ हेक्टर जागा पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या नावे वर्ग करण्यासंदर्भातील प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडून महसूल व वन विभागास सादर करण्यात आला असून त्या विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.

सदर जमीन हस्तांतरणाच्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर कोयनानगर येथे स्थापन करण्यात येणाऱ्या राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दल / पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या इमारत व इतर बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## गंगापूर व खुलताबाद (जि.औरंगाबाद) तालुका क्रिडा संकुलाच्या कामाबाबत

**(१५) १०६२० (२३-११-२०२१) श्री.अंबादास दानवे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.औरंगाबाद) येथील तालुका क्रिडा संकुलाकरीता सन २०१४ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर क्रिडा संकुलाच्या कामाकरीता रुपये १ कोटी ५ लक्ष निधीची प्रशासकीय मंजूरी मिळाली, सदर कामाकरीता रुपये ९७ लक्ष खर्च होऊनही कराराप्रमाणे क्रिडा संकुलाचे काम पूर्ण करण्याची मुदत माहे, जून, २०१५ असताना अद्यापही क्रिडा संकुलाचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथे सन २००३ मध्ये तत्कालिन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते रुपये २५ लाख खर्च करुन तालुका क्रिडा संकुलाची इमारत बांधण्यात येऊनही आज १८ वर्षाचा कालावधी लोटला तरी क्रिडा संकुल सुरु झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रिडा संकुलाच्या इमारतीकडे जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांच्या झालेल्या दुर्लक्षामुळे इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गंगापूर व खुलताबाद क्रिडा संकुलाची इमारतीची दुरुस्ती, देखभाल नुतनीकरण करण्यासह क्रिडा संकुलाची इमारत कार्यान्वित होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२२-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

गंगापूर तालुका क्रीडा संकुलासाठी मंजूर निधीतून विविध कामे पूर्ण करुन दिनांक २९/१०/२०२१ रोजी क्रीडा संकुल समितीस हस्तांतरीत करण्यात आले आहे.

(२) व (३) खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथे जागेबाबत न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्याने सदर ठिकाणी क्रीडा सुविधांचे काम सुरु करता आले नाही.
(४) गंगापूर तालुका क्रीडा संकुल, क्रीडा संकुल समितीकडे हस्तांतरीत करुन कार्यान्वित केले आहे. तसेच खुलताबाद तालुका क्रीडा संकुलासाठी नवीन जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चेंबूर, मुंबई येथील वाशीनाका विष्णूनगर ते गडकरी खाण दरम्यान पार्किंगमाफिया टँकर चालकांकडून पैसे घेत असल्याबाबत

**(१६) १०६६१ (१७-११-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर, मुंबई येथील वाशीनाका विष्णूनगर ते गडकरी खाण दरम्यान पार्किंग केलेल्या टँकर चालकांकडून पार्किंगमाफिया पालिकेचे टेंडर नसताना पावत्या देऊन पैसे घेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माफियांकडून रस्त्याच्या दोन्ही बाजुला पार्किंग केली जात असल्याने एल.यु. गडकरी मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, तसेच वाशीनाका, माहूल परिसरात बीपीसीएल आणि एचपीसीएल सारख्या तेल कंपन्या असल्याने याठिकाणी तेल, केमिकल व घरगुती वापराचे सिलेंडर भरण्यासाठी देशभरातून दररोज हजारो टँकर येत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पार्किंगमाफिया पालिकेकडून पार्किंग मिळाली असल्याचे दर्शवून कोणत्याही अधिकृत संस्थेचे नाव नसलेल्या बनावट पावत्या छापून टॅकरचालकांना देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोषी पार्किंग माफियांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) एल.यु.गडकरी खाण रस्त्याच्या दोन्ही बाजूला अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडीबाबत तक्रार प्राप्त झाल्यास सदर अवजड वाहनांवर आवश्यक कारवाई करण्यात येते. या वर्षी माहे नोव्हेंबर, २०२१ पर्यंत २५५४७ अवजड वाहनांवर ई-चलन कारवाई करण्यात आलेली असून क्रेनद्वारे १०५९ वाहने हटविण्यात आलेली आहेत.

वाशीनाका, माहूल परिसरात बीपीसीएल आणि एचपीसीएल सारख्या तेल कंपन्या असल्याने याठिकाणी तेल, केमिकल व घरगुती वापराचे सिलेंडर भरण्यासाठी देशभरातून दररोज हजारो टँकर येत असल्याने सदर वाहनांना त्यांच्या कंपनीच्या आत पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत समज कंपन्यांना देण्यात आलेली आहे.

(३) व (४) ट्रॉम्बे वाहतूक विभाग व आर.सी.एफ.पोलीस स्टेशन येथे याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

त्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

## पिंपरी (जि.पुणे) येथील शिक्षिकेवर झालेल्या अत्याचाराबाबत

**(१७) १०६६७ (२३-११-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.पुणे) येथे निवृत्त एसीपी असल्याचे सांगून एका शिक्षिका महिलेला दरमहा १० टक्के व्याजाने पैसे देतो, असे सांगून तिच्यावर लैंगिक अत्याचार करुन विवस्त्र अवस्थेतील फोटो काढून पिडीत महिला व तिच्या कुटुंबियास जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) व (२) पिडित महिलेस पैशाचे अमिष दाखवून महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत, पिडित महिला व तिच्या कुटुंबियास जीवे मारण्याचे धमकावल्याबाबत सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड येथे गु. र. क्र. ३७१/२०२१, भा. द. वि., कलम ३७६, ३८४, १७०, ५०६ सह सावकारी अधिनियम, २०१४ चे कलम ३९ अन्वये दिनांक १०/०९/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड येथे दाखल गु. र. क्र. ३७१/२०२१ मध्ये निवृत्त एसीपी असल्याचे खोटे सांगणाऱ्या आरोपीस दिनांक ११/०९/२०२१ रोजी अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईत चोरट्या मार्गाने आणलेले दोन टेम्पो गुटखा नवी मुंबई पोलिसांनी जप्त केल्याबाबत

**(१८) १०६७४ (२३-११-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत चोरट्या मार्गाने आणलेले दोन टेम्पो गुटखा नवी मुंबई पोलिसांनी जप्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली आहे, सदर कारवाईत किती मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अवैधरित्या गुटखा आणणाऱ्या टोळीची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडे दिनांक १७/०९/२०२१ रोजी ओडीसा भवन, सेक्टर नं. ३० ए, वाशी नवी मुंबई समोरील रोडवर करण्यात आलेल्या

छापा कारवाईत वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ३२३/२०२१ भा.द.वि. कलम ३०७, ३५३, १८८, २७२, २७३, ३२८, १७१, ४६५, ४६८, ४७१, ४२०, ३४ सह अन्न सुरक्षा कायदा कलम २६(२)(i), २६(२)(IV), २७(३)(D), २७(३)(E), भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१),(३) चे उल्लंघन १३५ अन्वये दिनांक १८/०९/२०२१ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात ०७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात २७,९३,८८०/- रुपये किंमतीचा विमल पान मसाला व एकूण ८८,४६,८८० रुपये किमतींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अवैधरित्या गुटखा आणणाऱ्या टोळीची चौकशी करण्यात आली असून तपास चालु आहे. सदर गुन्हयातील आरोपी व पाहिजे आरोपी वेगवेगळया प्रकारच्या पान मसाला व तंबाखु (सुगंधीत) मालाचा साठा करुन महाराष्ट्रात विक्री करीत असताना मिळून आले आहेत.

तळोजा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. २५३/२०२१, भादंवि कलम १८८, २७२, २७३, ३२८, ३४, अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६, नियम व नियमने २०११ चे कलम २६(१), २२(२)(ii), २२(२)(iv), तसेच २७(३)(d), २७(३)(e), ३०(२)(a) सह अन्न सुरक्षा आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसूचना क्रमांक ५००/७ दिनांक १५/०७/२०२१ सह Regulation No/०२/३.४ of Safety & Standards (Prohibition) and Restriction on Sales) Regulation २०११ & Regulation No ३/०१/७ of Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation २०११ Section ५९ अन्वये दिनांक २६/०८/२०२१ रोजी दाखल करण्यात आला. सदर गुन्हयात ०१ आरोपी अटक करण्यात आला आहे. सदर आरोपीकडुन २२,४६,०६४/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

(३) वाशी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ३२३/२०२१ व तळोजा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. २५३/२०२१ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्हयामधील आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या नोकर भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) १०६८१ (२३-११-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ६८६६ ला दिनांक ९ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या नोकर भरतीत झालेला भ्रष्टाचार व इतर गैरप्रकाराची विशेष अधिकारी नेमून कारवाईचा अहवाल घेण्यात यावा, अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.कृषी मंत्री यांना ई-मेल द्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर व चुकीचे निर्णय घेवून नोकर भरतीत करण्यात आलेला गैरव्यवहार, इतर गैरप्रकारांची तसेच चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यासाठी विशेष अधिकारी नेमणूक करुन त्याचा ॲक्शन टेकन रिपोर्ट घेण्यात यावा या मागणी प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्यास्तरावर समिती गठीत करून अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आले होते, सदर अहवाल प्राप्त झालेला असून त्यावर शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, याबाबतची थोडक्यात व सविस्तर माहिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांच्या नोकर भरतीत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१५-१२-२०२१) :** (१) होय, खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या स्तरावर समिती गठीत करुन अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आलेले होते. सदर अहवाल प्राप्त झालेला असून त्यावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विद्यापीठातील प्राध्यापक व इतरांना नियमबाह्यरित्या जादा वेतन अदा केल्याबाबत

**(२०) १०६९१ (२३-११-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक व इतरांना नियमबाह्यरित्या जादा वेतन अदा करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधीताकडून वसूली करण्याचे आदेश शासनाने सन २०१९-२०२० मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने पत्र क्र.संकीर्ण/१५१७/प्र.क्र.४९७/६-अे, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० प्रमाणे सर्व विद्यापीठांना चौकशी, कारवाई व माहितीबाबतचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन जादा वेतन वितरीत केलेल्या प्राध्यापक व इतरांकडून वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१५-१२-२०२१) :** (१) होय, खरे आहे. राज्यातील कृषी विद्यापीठांतील शिक्षकवर्गीयांना ६ व्या वेतन आयोगात केल्या गेलेल्या अतिप्रदानाची वसुली करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २४/०८/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीयांना ६ व्या वेतन आयोगात झालेल्या अतिप्रदानाची वसुली करण्याबाबतच्या दिनांक २४/०८/२०१८ च्या शासन निर्णयाविरोधात मा.उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठात संबंधित शिक्षकवर्गीयांकडून रिट याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. रिट याचिकांच्या सुनावणीदरम्यान मा.न्यायालयाने शासन निर्णय दिनांक २४/०८/२०१८ नुसार अतिप्रदानाची वसुली करण्यास अंतरिम स्थगिती दिली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.